प्रेस नोट दि. १८/०८/२०१८

फिर्यादी यांना त्यांचे मोबाईल क्रमांकावर HP-622129 यावरून १ कोटी ७० लाख रूपयांची लॉट लागल्याचा मेसेज प्राप्त झाला व फिर्यादी यांनी त्यांची सर्व वैयक्तिक माहिती व बँकिंग विषयीची माहि claimswonuk@gmail.com व rbibankclaims@gmail.com या ईमल आयडीवर पाठविर्ल त्यानंतर फिर्यादी यांना त्यांचे ईमेल आयडीवर http://rbiii.online.co.nf/ अशा स्वरूपाची लिंक पाठवुन फिर्या यांचेकडून माहिती प्राप्त करून घेतली. त्यानंतर प्रथम फिर्यादी यांना टॅक्स कोड करिता ४५,८००/-, फिर्यादी यां अकाऊंट अपग्रेड करण्याकरिता २,४८,०००/-, ॲन्टी टेरेरीस्ट सर्टिफिकेट करिता १,७०,०००/- इत्यादीसाठई पै भरण्यास भाग पाडले. त्यानंतर फिर्यादी यांना रॉयल बँक ऑफ स्कॉटलंड या बँकेचे मास्टर कार्ड कुरियरने पाठविले फिर्यादी यांना प्राप्त झाले. परंतु फिर्यादी यांना सदरचे मास्टर कार्ड ॲक्टीवेट करण्याकरिता ६ लाख रूपये भरण्या सांगितले त्यानुसार फिर्यादी यांना पैसे भरले. त्यानंतर फिर्यादी यांना पुन्हा ४,४५,०००/- इतकी रक्कम भरण्या सांगितले. फिर्यादी यांचेकडे पैसे उपलब्ध नसल्याने त्यांना सॅमसंग कंपनी २ लाखाची मदत करण्यात येईल अ सांगण्यात आले. परंतु फिर्यादी यांनी भरलेली पूर्ण रक्कम पुन्हा मागितली त्यामुळे फिर्यादी यांना पैसे रिफं करण्याकरिता ४५०००/-,३८२००/-,७५०००/-,८००००/-७५,०००/-,८००००/- व १०००००/- इतकी रक्कम भरली. परं फिर्यादी यांना कोणतीही लॉटरीची रक्कम अथवा बक्षिस मिळाले नसल्याने त्यांची फसवणुक झाली असल्याची खा झाल्याने त्यांनी फरासखाना पोलीस स्टेशन येथे गु.रजि.नं. १८३/१८ भा.द.वि. ४१९,४२० सह माहिती तंत्रज्ञा अधिनियम २००८ चे कलम ६६सी, ६६डी प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

वर नमुद गुन्ह्याचा सायबर सेलकडून समांतर तपास करित असताना, तपासादरम्यान आरोपींचे मोबाई क्रमांकाचे विश्लेषणावरून व इतर तांत्रिक माहितीचे आधारे यातील आरोपी हे दिल्ली येथील असल्याचे प्रथम दर्शन निष्पन्न झाल्याने सदर आरोपींचा शोध घेणेकामी सायबर विभागाकडील १ पोनि, १ पोउपनि व पथक दिल्ली येथे रवान झाले. त्यानुसार आरोपींचा दिल्ली येथे जाऊन शोध घेतला असता आरोपी नामे Nmoye Omoruji Age – 3 (Nigerian National) यास तिलकनगर, दिल्ली येथून अटक करण्यात आली असून त्याचेकडून गुन्ह्या वापरलेले ६ मोबाईल संच, सिम कार्डस, २ लॅपटॉप व इंटरनेट डिव्हाईस जप्त करण्यात आले आहे. पुढील तपा फरासखाना पोलीस स्टेशन करित आहेत.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त डॉ. के व्यंकटेशम्, मा. पोलीस सह आयुक्त श्री. बोडखे, मा. अप पोलीस आयुक्त, गुन्हे श्री. देशपांडे, मा. पोलीस उप आयुक्त, आर्थिक व सायबर गुन्हे ज्योतीप्रिया सिंह व मा. सहा पोलीस आयुक्त, आर्थिक व सायबर गुन्हे श्री. मोरे यांचे सूचनेनुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक राधिका फडके यां मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संतोष बर्गे, पोलीस उप निरीक्षक नितीन मस्के व कर्मचारी अजित कु-हे, नितेश शेलार, शिरीष गावडे, संतोष जाधव, अनुप पंडीत, शितल वानखेडे यांचे पथकाने केली आहे.

सर्व नागरिकांना आव्हान करण्यात येते की, ९७११५८७४१०,९९५३२२२०३९,९८७३२१०६७२, +४४७७८३७२९९१ यावरून संपर्क साधून १) स्टेट बँक ऑफ इंडिया, अकाऊंट नं. २०३५४९७४३४, २०३५२८४९७९३,३५१८४३०९०९७ २ कॅनरा बँक, अकाऊंट नं. २७८३१०१०१४२२२८, ३११०५९८७४७, १७२३१०१५६२३२२ ३५३४६४१०८३,२०४०१०१३४१७६,२७८३१०१०१२२० ३) ॲक्सिस बँक, अकाऊंट नं. ९१७०१००५३८६३९२२ ४) युको बँ , अकाऊंट नं. २३६३०११००२५१०९ ५) पंजाब नॅशनल बँक, अकाऊंट नं. ०५९१०००१००३४१४२० या बँक अकाऊंटव पैसे भरावयास लावले असल्यास त्यांना तात्काळ फरासखाना पोलीस स्टेशन येथे संपर्क करावा. अशा प्रकारच्य कोणत्याही अमिष, लॉटरी/ बक्षिसास बळी पडू नये.